**सविता गायकवाड**



सविता सोलापूर शहरातील एका झोपडपट्टी भागात आपल्या परिवारासह राहते. सविताच्या परिवारात पती मुलगा आहे. सविता कुटुंब चालविण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी काम करीत आली आहे. काही वेळा काम मिळत नाही काही वेळा कमी कलावधीसाठीची कामे करावी लागते. स्वावलंबी कुटुंब व्हावे. मुलाचे शिक्षण आणि घर चालविण्यासाठी हातभार लागावा म्हणून सविता सतत काहींना काही काम मिळविण्याचा प्रयत्न करीत असते. पतीच्या पगारावर घर चालणे अशक्य होते. पती-पत्नींनी मिळून काम केले तर एकावर घर चालविण्याचा भर सहन करावा लागणार नाही अस सविताचे मत आहे. कोरोणा काळात यापूर्वी कामावर असणाऱ्या लोकांना कमावरून कमी करण्यात आले त्यामध्ये कोरोणा काळात मिळेल ते काम करत असलेल्या सविता सारख्या गृहिणीस काम मिळन कठीण झाल होते.

सविताला कोरोंना काळात वाटत होते जर, आपल्याला गाडी चालविता येत असती तर आपणही काहीतरी काम करू शकलो असतो. गाडी चालवता येत नसल्याने या कामाबाबत सविता विचार करू शकत नव्हती.

सविताला वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशनच्या माध्यमातून ड्रायव्हिंग प्रशिक्षण दिले जात असल्याची माहिती मिळाली. वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशनच्या सहकार्याने शिवधन ड्रायव्हिंग स्कूलमध्ये सविताने रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण केले. लर्निंग व पक्के लायसन्स घेऊन आपल्या रिक्षा चालविण्याच्या कामाला सुरुवात केली.

सविता सांगते, "वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशनच्यामाध्यमातून राबविलेल्या या ड्रायव्हिंग प्रशिक्षणामुळे रिक्षा ड्रायव्हिंगचे कौशल्य प्राप्त करता आले. स्वतःच्या सक्षमीकरणा सोबतच कुटुंबाचे सक्षमीकरण मला करता येईल. सध्या मी कर्ज काढून स्वतःची रिक्षा घेण्याच्या तयारीत आहे. माझी इच्छा आहे की मी स्वःची रिक्षा चालवायची. अधून मधीन भाडे तत्वावर रिक्षा चालवते. माझ्या रोजगारात भर पडून माझ्या कुटुंबाला मदत तर होईलच त्यासोबत कुटुंब सावरण्यास मदत होईल. वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशन आपले खूप खूप आभार!"


DRIVE WITH PRIDE
सारथी युथ फौंडेशन, सोलापूर.
आणि
वात्सल्य ट्रस्ट मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने
वाहन चालक प्रशिक्षण
DRIVE PRIDE
MH13CT8132
LPG


DRIVE WITH PRIDE
सारथी युथ फौंडेशन, सोलापूर.
आणि
वात्सल्य ट्रस्ट मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने
वाहन चालक प्रशिक्षण
DRIVE PRIDE
MH13CT8132
LPG